# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-४२२ ००२

रजि. ऑफीस - "आदिवासी विकास भवन ", ३ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-२

दुरध्वनी - (०२५३) २३१५८६०,

Web-www.mahashabari.in E-mail- shabarinsk@gmail.com


## नागरिकांची सनद

एन.एस.टी.एफएडी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत योजना व राज्य शासन पुरस्कृत कर्ज योजना-

| अ.क्र. | मुद्दा | तपशिल |
|---|---|---|
| १ | सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी | संबंधीत शाखा व्यवस्थापक शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक |
| २ | कायदे / नियम / शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पूरविल्या जाणार आहे | १) एन.एस.टी.एफ.डी.सी. नवी दिल्ली, यांचेकडील प्राप्त होणारे इरादा पत्रे.<br>२) शासन निर्णय क्रमांक-आविवि-२०२३/प्र.क्र.१३८/का.३ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक- १४ मार्च, २०२४. |
| ३ | थोडक्यात कार्यपद्धती | • एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली व राज्य शासन पुरस्कृत कर्ज योजनांसाठी प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने शाखा कार्यालयांस लक्षांक विभागून देण्यांत येतो.<br>• शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या कर्ज योजनांसाठी इच्छुक उमेदवारांकडून www.mahashabari.in या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यांत येतात.<br>• शाखा कार्यालय स्तरावरील योग्य व पात्र लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्तावांची छाननी करुन मुल्यमापन समितीच्या शिफारशीसह लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव ऑनलाईन मुख्य कार्यालयास प्राप्त होतात.<br>• त्यानुसार मुख्य कार्यालयाकडून सदर कर्ज प्रकरणे मंजुर करुन शाखा कार्यालयांस पाठविण्यांत येतात.<br>• शाखा कार्यालय स्तरावरुन सदर मंजुर लाभार्थ्यांना कर्ज मंजुरी आदेश निर्गमित करण्यांत येतात.<br>• सदर मंजुर झालेल्या कर्ज प्रस्तावांच्या अनुषंगाने शाखा कार्यालय स्तरावर लाभार्थ्यांची सहभाग रक्कम, नोटरी, करारनामा, इ. कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर संबंधित शाखा व्यवस्थापक हे सदर लाभार्थ्यांना निधी वर्ग करणेकामी मुख्य कार्यालयास ऑनलाईन Payment Request पाठवतात.<br>• सदर प्राप्त होणाऱ्या Payment Request च्या |

| | | |
|---|---|---|
| | | अनुषंगाने मुख्य कार्यालय स्तरावरुन लाभार्थ्यांच्या खात्यात निधी वर्ग करण्याची कार्यवाही करण्यांत येते. |
| ४ | सेवा मिळण्यासाठी नागरीकांची पात्रता | १) लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.<br>२) लाभार्थीचे वार्षिक कौटुबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.<br>३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.<br>४) महिला सशक्तीकरण योजनेसाठी व स्वयंसहाय्यता बचतगट योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जीन मनी अपेक्षित नाही. तथापि इतर योजनांसाठी स्वत:चा हिस्सा म्हणून ५% किंवा १०% सहभाग रक्कम घेण्यांत येते.<br>५) महिला लाभार्थ्यांच्या बाबतीत जात प्रमाणपत्र नसल्यास महिलेच्या पतिचे अथवा मुला मुलींचे जात प्रमाणपत्र देखील ग्राहय धरावे.<br>६) रक्कम रु.५.०० लक्ष पेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामीनदार घेण्यांत यावे. |
| ५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | www.mahashabari.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज सादर करण्यांत येतात. |
| ६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | www.mahashabari.in |
| ७ | अर्जाची किंमत असल्यास | निरंक |
| ८ | कोणती कागदपत्रे जोडायची | **कर्ज योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे :-**<br>१) तहसिल किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला. (फक्त आदिवासी)<br>२) शाळा सोडल्याचा दाखला. (वय वर्ष १८ ते ४५)<br>३) तहसिल कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी रु.३,००,०००/- इतके असावे.)<br>४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.<br>५) व्यवसाय प्रकल्प अहवाल संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी स्वत: इच्छुक लाभार्थींना मार्गदर्शन करुन संक्षिप्त रित्या तयार करुन देणे.<br>६) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहीत्याचे कोटेशन.<br>७) रेशनकार्ड छायाप्रत.<br>८) आधारकार्ड छायाप्रत.<br>९) पॅनकार्ड असल्यास त्याची छायाप्रत.<br>१०) लाभार्थ्यांचे स्वत:चे बॅक खात्याचे पासबुकची छायाप्रत.<br>११) तीन पासपोर्ट साईज फोटो.<br>१२) वाहन व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे प्रचलित कायद्यानुसार परमीट वाहनासाठी आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| | | कागदपत्रे.<br>**बचतगट / सहकारी संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे-**<br>१) बचतगट / सहकारी संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र.<br>२) बचतगट / सहकारी संस्थांचे सर्व सभासद यादी, त्यांचे रेशनकार्ड व जातीचे दाखले.<br>३) बचतगट / सहकारी संस्थांचे कमीत कमी सहा महिन्यांचे बँक खाते उतारा / स्टेटमेंट.<br>४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.<br>५) व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचे कोटेशन.<br>**योजनानिहाय व्याजदराचा तपशिल-**<br>१) महिला सशक्तीकरण कर्जावर द.सा.द.शे.४% एवढया अल्प दराने सरळ व्याज आकारले जाते.<br>२) रु.५ लक्ष पर्यंतचे कर्जावर द.सा.द.शे.६% सरळ व्याज आकारले जाते. तर रु.५ लक्ष ते रु.१० लक्ष पर्यंतचे कर्जास द.सा.द.शे.८% सरळ व्याज आकारणी केली जाते.<br>३) रु.१० लक्ष वरील कर्जास द.सा.द.शे.१०% सरळ व्याज आकारले जाते.<br>४) राज्य शासन योजनेअंतर्गत रु.१० लक्ष ते १५ लक्ष वरील कर्जास द.सा.द.शे.८% सरळ व्याज आकारले जाते. |
| ९ | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर किती दिवसात सेवा पूरविली जाईल | निधी उपलब्ध असल्यास १२० दिवसाचे आत |
| १० | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करावयाची आहे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | मा.व्यवस्थापकीय संचालक शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक |
| ११ | अपिलीय प्राधीकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसाचे आत |

Leena M Bansod

**(लीना बनसोड, भा.प्र.से)**
व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,
नाशिक-२

# नागरिकांची सनद

कौशल्य विकास योजना (Skill Development)

| अ.क्र. | मुद्दा | तपशिल |
|---|---|---|
| १ | सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी | १. सल्लागार, कौशल्य विकास, मुख्य कार्यालय, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक<br>२. प्रकल्प समन्वयक, कौशल्य विकास, मुख्य कार्यालय, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक |
| २ | कायदे / नियम / शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पूरविल्या जाणार आहे | १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: विकेस २०२१/प्र.क्र.१६/का.१९ दिनांक २५.०१.२०२३.<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:-कौविका २०२२/प्र.क्र.४६/का. ०९. दिनांक १६.०२.२०२४. |
| ३ | थोडक्यात कार्यपद्धती | • १) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणारी आदिवासी विभागांतर्गत रोजगारभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम (एकलव्य कुशल) या योजनेचे अर्ज https://eklavyakushal.in/ या संकेतस्थळावर मागविण्यात येतात.<br>• मुख्य कार्यालय स्तरावरील योग्य व पात्र अर्जदाराच्या अर्जाची कागदपत्रे पडताळणी करुन मुख्य कार्यालयाकडून मान्यता दिली जातृे<br>• त्यानुसार मुख्य कार्यालयाकडून सदर अर्जादारांची प्रती बॅच ३० अर्जदार प्रमाणे यादी मान्यता देऊन संबंधित प्रशिक्षण संस्थेस पाठविले जाते.<br>• मान्यता प्राप्त होताच प्रशिक्षण संस्था मान्यता प्राप्त बॅच ला प्रशिक्षण देण्यास सुरुवात करते.<br>• प्रशिक्षण पुर्ण झालेल्या किमान ७५ टक्के उमेदवारांना रोजगार/स्वयंराजगार संधी उपलब्ध करुन दिली जाते. |
| ४ | सेवा मिळण्यासाठी नागरीकांची पात्रता | १) लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.<br>२) लाभार्थ्याकडे जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहृे<br>३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.<br>३. कौशल्य विकासाचे प्रशिक्षण घेण्याकरीता अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेले शिक्षण घेतलेले असावे. |
| ५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | https://eklavyakushal.in/ या संकेतस्थळाच्या माध्यमातून |

| | | |
|---|---|---|
| | | ऑनलाईन अर्ज सादर करण्यांत येतात. |
| ६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | https://eklavyakushal.in/ |
| ७ | अर्जाची किंमत असल्यास | निशुल्क |
| ८ | कोणती कागदपत्रे जोडायची | १. जातीचा दाखला<br>२. बॅक पासबुक<br>३. आधार कार्ड<br>४. शैक्षणिक कागदपत्रे<br>५. पासपोर्ट साइज फोटो |
| ९ | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर किती दिवसात सेवा पूरविली जाईल | निधी उपलब्ध असल्यास ३० दिवसाचे आत |
| १० | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करावयाची आहे ते कार्यालय तथा अपिलीय अधिकारी | मा.व्यवस्थापकीय संचालक शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक |
| ११ | अपिलीय प्राधीकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसाचे आत |

Leena M Bansod

**(लीना बनसोड, भा.प्र.से)**

व्यवस्थापकीय संचालक

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,

नाशिक-२